

म्हाडा घरांच्या किमतीत वाढ; अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ऐनवेळी किंमतीत बदल करण्याची वेळ

▶▶ पान ४ वर

दैनिक
# अग्रलेख

RNI NO - MAHMAR/2021/81361



६ महिन्यांनंतरही अवकाळीग्रस्तांना शासकीय मदतीची प्रतिक्षाच

▶▶ पान ३ वर

मुख्य संपादक - उमेश सुरेखा मारुती भेरे

लेखणीला जेव्हा भाले फुटतात...

मुंबई-ठाणे-पालघर-नाशिक-रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यांत प्रकाशित होणारे दैनिक वृत्तपत्र

Email - dainikagralekh13@gmail.com

Epaper - https://www.dainikagralekh.com/epaper/

वर्ष ४ थे ● अंक १५६ वा ★ रविवार, दि. १५ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत २ रु.


## उद्याची सुट्टी रद्द; ईद-ए-मिलादची सुट्टी बुधवारी मिळणार

**मुंबई (अग्रलेख वृत्तसेवा) -** ईद-ए-मिलाद निमित्त सोमवारी १६ सप्टेंबर रोजी सुट्टी जाहीर झालेली होती. मात्र महाराष्ट्र सरकारने मुंबई शहर आणि मुंबई उपनगर येथे ही सुट्टी रद्द केली आहे. या दोन जिल्ह्यांत आता बुधवार, १८ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादची सुट्टी असेल. तसेच उर्वरित जिल्ह्यांमध्ये त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेऊन सुट्टीबाबत निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र सरकारने शासन निर्णय काढून या निर्णयाची माहिती दिली आहे. काही मुस्लीम संघटना आणि लोकप्रतिनिधींनी याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारला दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे. अनंत चतुर्दशीचा सण मंगळवारी, १७ सप्टेंबर रोजी येत आहे. यामुळे मुंबई आणि आसपासच्या भागात विसर्जनासाठी मोठी गर्दी उसळते.



तसेच आदल्या दिवशी ईद-ए-मिलादनिमित्त ठिकठिकाणी मुस्लीम धर्मीयांकडून जुलुस काढण्यात येत असतात. दोन्ही सण लागोपाठ आल्यामुळे काही मुस्लीम धर्मीय नेत्यांनी सोमवारी असलेली सुट्टी ही बुधवारी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी सरकारकडे केली होती. समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख आणि काँग्रेसचे आमदार नसीम खान यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन सोमवारची (१६ सप्टेंबर) शासकीय सुट्टी दिनांक १८ सप्टेंबर रोजी म्हणजे अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी द्यावी, अशी मागणी केली होती. नसीम खान यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात म्हटले की, १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी असल्यामुळे मुस्लीम समाजाने ईद-ए-मिलादचे जुलूस १८ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरून दोन्ही समाजाला त्यांचे सण शांततेत साजरे करता येतील. सलग दुसऱ्या वर्षी मुस्लीम समाजाने जुलूस काढण्यासाठी ईद-ए-मिलादचा दिवस सोडून दुसऱ्या दिवसाची निवड केली आहे. हिंदू आणि मुस्लीम समाजाला शांततेत आपले सण साजरे करता यावेत, तसेच यामुळे गोंधळ निर्माण होऊ नये, यासाठी हा निर्णय घेतला गेल्याचे सांगण्यात येत आहे.

## समाज माध्यमांवर सायबर सेलची नजर; चुकीच्या पोस्ट टाकणाऱ्यांवर होणार कारवाई

**- मनोज कामडी -**

**जव्हार (अग्रलेख वृत्तसेवा) -** जव्हार उपविभागातील जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड व कासा पोलीस स्थानक हद्दीत सण-उत्सवाच्या काळात माध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांवर अफवा पसरवणाऱ्यांवर सायबर सेल लक्ष ठेवून असल्याचे जव्हार येथील उपविभागीय पोलीस अधिकारी गणपतराव पिंगळे यांनी सांगितले आहे. त्यामुळे कोणत्याही नागरिकांनी समाज माध्यमांवर चुकीच्या पोस्ट करू नये, असे आवाहन पालघर पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.




दरम्यान, गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे दोन्ही सण यावर्षी एकाच कालावधीत आले आहेत. जव्हार उपविभागात हे दोन्ही सण साजरे करताना सर्व धर्मीयांनी परस्पर सौहार्द व शांततेला गालबोट लागणार नाही याची काळजी घेऊन एकोप्याने व आनंदाने सण साजरे करावेत, जेणे करून सामजिक सलोखा अबाधित राहील. उत्सवांचे या काळात सर्व धर्मीयांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रम, देखावे, वेगवेगळ्या प्रतिकृती, वेगवेगळ्या सणांच्या मिरवणुका सुरू आहेत. त्या संदर्भातील माहिती प्रसिद्ध करताना काळजी घ्यावी. सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करावा. सामाजिक जाणिवांचे भान ठेवावे. समाज माध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे समाज माध्यमांचा योग्य प्रकारे सर्वांनी वापर करावा. शिवाय, नागरिकांनी समाज माध्यमांवर येणाऱ्या कोणत्याही पोस्टबद्दल प्रतिक्रिया देताना शांततेने प्रतिक्रिया व्यक्त करावी. पोलिसांची मदत घ्यावी. काही समाजकंटक अशा वेळी जुन्या पोस्ट टाकून लोकांची दिशाभूल करतात. अफवा पसरवितात, टीका करतात.

▶▶ पान २ वर

## मुंबई उच्च न्यायालयाकडून अटक वॉरंटची बतावणी; सायबर चोरट्यांकडून एकाची १२ लाखांची फसवणूक

**पुणे (अग्रलेख वृत्तसेवा) -** मुंबई उच्च न्यायालयाकडून अटक वॉरंट बजाविण्यात आल्याची बतावणी करून सायबर चोरट्यांनी वानवडी भागातील एकाची पावणेबारा लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदाराच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी संपर्क साधला होता. तुम्ही एका खासगी बँकेकडून पावणेतीन लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे. कर्जाची परतफेड न केल्याने मुंबई उच्च न्यायालयाकडून अटक वॉरंट बजाविण्यात आले आहे, अशी बतावणी सायबर चोरट्यांनी तक्रारदाराकडे केली. त्यानंतर चोरट्यांनी मुंबईत पोलीस दलात




असल्याचे सांगून अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे भरावे लागतील, अशी धमकी दिली. तक्रारदाराला चोरट्यांनी एका बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. तक्रारदाराने चोरट्यांच्या बँक खात्यात वेळोवेळी ११ लाख ७९ हजार रुपये जमा केले. चोरट्यांनी पुन्हा त्यांच्याकडे पैसे मागितले. संशय आल्याने तक्रारादराने शहानिशा केली. फसवणूक झाल्याचे

▶▶ पान २ वर

## घाटकोपरमधील इमारतीला भीषण आग; १३ जण गुदमरले; रुग्णालयात उपचार सुरु



**मुंबई (अग्रलेख वृत्तसेवा) -** घाटकोपर येथील रमाबाई वसाहतीतील शांती सागर इमारतीला शुक्रवारी मध्यरात्री १.३० च्या सुमारास भीषण आग लागली. आगीमुळे इमारतीत धुराचे साम्राज्य पसरले होते. धुरामुळे १३ जण गुदमरले असून यापैकी १२ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर एकाला उपचार करून घरी पाठविण्यात आले. शांती सागर या सात मजली इमारतीच्या तळमजल्यावरील विद्युत यंत्रणेत शुक्रवारी मध्यरात्री आग लागली. आग विद्युत तारांच्या संपर्कात आल्याने आगीचा भडका उडाला. आगीमुळे संपूर्ण इमारतीत धुराचे लोट पसरले. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य हाती घेतले. मोठ्या प्रमाणात धूर पसरल्याने अनेक रहिवासी इमारतीत अडकले होते. ▶▶ पान २ वर

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ठाणे जिल्हाध्यक्ष पदी विद्याताई वेखंडे यांची निवड

**- रंजिता दुपारे -**

**वासिंद प्रतिनिधी (अग्रलेख वृत्तसेवा) -** विद्याताई वेखंडे यांच्या सामाजिक कार्याची, त्यांची पक्ष संघटना वाढवणे व पक्षाबद्दल एकनिष्ठता, पक्षाबद्दल दिलेल्या योगदानाची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ठाणे जिल्हा अध्यक्ष पदी विद्याताई वेखंडे यांची निवड करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील ताईंचे काम खुप वाखाणण्याजोगी आहे. पक्ष वाढीसाठी त्यांची तळमळ, खेडोपाडी प्रत्येकाच्या सुखदु:खात सामिल होऊन



लोकांना आपले करणे, पक्षाचे ध्येय उद्दिष्ट, विचार लोकांना पटवून देणे, गोरगरिबांना मदत करणे, ही त्यांना त्यांच्या वडिलांपासून मिळालेली शिकवण व त्यांचा वारसा त्या चालवत आल्या आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेऊनच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार व पक्षाचे प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटील यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यांनी ताईंवर जो विश्वास ठेवला आहे त्याचा फायदा पक्षाला होईलच आणि ताई त्या पदाला न्याय देतील, अशी चर्चा सर्वत्र चालू आहे.

# संपादकीय

## लोकसभेप्रमाणे मतांच्या टक्क्यात वाढ शक्य

जम्मू-काश्मीरमध्ये अनुच्छेद ३७० रद्द झाल्यानंतर तसेच, राज्याचा दर्जा काढून घेतल्यानंतर पहिल्यांदाच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत लोकांनी रांगा लावून मतदान केले होते. दोन्ही विभागांमध्ये मिळून सुमारे ५९ टक्के मतदान झाले होते. आता दहा वर्षांनंतर होत असलेल्या विधानसभेच्या निवडणुकीतही लांबलचक रांगांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे लोकांनी मतदान केले तसेच, विधानसभा निवडणुकीतही होईल. लोकांनी स्वत:हून मतदानात भाग घेतला होता. पूर्वी देखील लोक मतदान करतच होते, असे मत श्रीनगरमधील एका व्यावसायिकाने व्यक्त केले. दहा वर्षांपूर्वी २०१४ मध्ये विभाजनवादी संघटनांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केल्यानंतरही जम्मू-काश्मीरमध्ये ६५.५ टक्के मतदान झाले होते. यावेळी तर विभाजनवादी-पाकिस्तानप्रेमी असे विविध गट विधानसभा निवडणुकीत स्वत:हून उतरले आहेत! लोकसभा निवडणुकीमध्ये बारामुल्ला मतदारसंघामध्ये रशीद इंजिनीअर या विभाजनवादी नेत्याला लोकांनी मते देत ओमर अब्दुल्लांचा पराभव केला होता. इंजिनीअर यांनी केंद्राने काश्मिरी जनतेवर केलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित करत लोकांना भावनिक आवाहन केले होते. त्याला मतदारांनी प्रचंड प्रतिसादही दिला होता. हेच इंजिनीअर आता तिहार तुरुंगातून सुटले असून त्यांचे काश्मीर खोऱ्यात स्वागतही केले गेले. इंजिनीअर रशीदसारखे विभाजनवादी विधानसभा निवडणुकीत संपूर्ण खोऱ्यात उमेदवार उभे करत असून काही दिवसांमध्ये त्यांच्या प्रचाराचा धुरळा उडालेला दिसेल, असे बहुसंख्य राजकीय नेत्यांचे म्हणणे आहे.

काश्मीर खोऱ्यामध्ये निवडणुकांवर बहिष्काराचे आवाहन करणाऱ्या जमात-ए-इस्लामी तसेच, हुरियत कॉन्फरन्स यांच्यासारख्या संघटनादेखील यावेळी निवडणुकीत उतरल्या आहेत. कधीकाळी लोकांना लोकशाही प्रक्रियेपासून लांब राहण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या संघटना मतदारांना मते देण्याची विनंती करत आहेत. केंद्र सरकार तसेच भाजपच्या धोरणांना विरोध करण्यासाठी काही अपक्षही उभे राहिलेले आहेत. संसदेवर झालेल्या हल्ला प्रकरणात फाशी झालेला अफझल गुरू याच्यावर अन्याय झाल्याची भावना खोऱ्यात आहे. हीच भावना उघडपणे व्यक्त करण्यासाठी अफझल गुरूचा भाऊ अजाझ गुरू याने उत्तर काश्मीरमधील सोपोर मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. 'आझादी'वाले निवडणुकीत सहभागी झाल्याने लोकही मतदानाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होतील, असे मानले जात आहे.

जम्मू व काश्मीर या दोन्ही विभागांमध्ये अनुच्छेद ३७० व राज्याचा दर्जा या दोन मुद्द्यांवर राजकीय पक्षांचा प्रचार केंद्रित झाला आहे. जम्मूमध्ये भाजपकडून अनुच्छेद ३७० रद्द झाल्यानंतर तिथे होणाऱ्या विकासाचा मुद्दा उपस्थित केला जात आहे तर, काँग्रेसकडून जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले जात आहे. काश्मीर खोऱ्यात मात्र सर्वच राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यामध्ये अनुच्छेद ३७०, राज्याचा दर्जा आणि पाकिस्तानशी चर्चा अशा तीन मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे. अनुच्छेद ३७० पुन्हा बहाल होण्याची सुतराम शक्यता नाही याची जाणीव असली तरी हा मुद्दा काश्मिरींच्या अस्मितेचा मुद्दा ठरला आहे. त्यामुळे राजकीय पक्षांना हा मुद्दा सोडून देता येत नाही, अशी कबुली नॅशनल कॉन्फरन्सच्या प्रवक्त्यांनी दिली. अस्मितेचे मुद्दे असले तरी विधानसभा निवडणुकीमुळे स्थानिक व विकासाच्या समस्याही महत्त्वाच्या ठरू शकतील, असेही या प्रवक्त्याचे म्हणणे होते. विधानसभा निवडणुकीत लोकांच्या असंतोषाला वाट काढून दिली जाणार असेल तर जम्मू-काश्मीरमध्ये सहा महिन्यांच्या कालावधीत होत असलेल्या निवडणुकीत पुन्हा रांगा लागू शकतील असे मानले जात आहे.

## रेलिगेअर प्रकरणी ईडीकडूनही गुन्हा दाखल




**मुंबई (अग्रलेख वृत्तसेवा) -** मुंबई पोलिसांनी नुकताच रेलिगेअर एन्टरप्रायझेस प्रा. लि. प्रकरणात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्याच्या आधारावर आता ईडीनेही याप्रकरणी गुन्हा (एन्फोर्समेंट केस इन्फर्मेशन रिपोर्ट) दाखल केला आहे. याप्रकरणी कंपनीच्या कार्यकारी अध्यक्ष डॉ. रश्मी सलुजा, सीएफओ नितीन अग्रवाल व अध्यक्ष निशांत सिंगल यांच्याविरोधात ईडीला बर्मन कुटुंबीयांबाबत चुकीची माहिती देणे व त्याआधारे १७९ कोटी रुपयांचा बेकायदेशीर फायदा घेतल्याचा आरोप आहे.

ईडीचे साहाय्यक संचालक राम नारायण यांच्या तक्रारीवरून मुंबई पोलिसांनी नुकताच माटुंगा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करणार आहे. त्या प्रकरणातील तक्रारीनुसार, ईडी मलविंदर मोहन सिंह आणि इतरांविरुद्ध तपास करीत होती. त्यात बर्मन कुटुंबियांवरही आरोप करण्यात आले होते. हे प्रकरण वैभव जालिंदर गवळी (रिलिगेअर एंटरप्रायझेस लि. चे शेअर होल्डर) यांनी दाखल केले होते. त्याबाबत गवळी यांना ईडीने पुराव्यांसह बोलावले होते. त्यावेळी ते कोणतेही पुरावे देण्यास असमर्थ ठरले व त्यांनी हे प्रकरण रेलिगेअरच्या सलुजा यांच्या सूचनेवरून दाखल केल्याचे ईडीला दिलेल्या जबाबात सांगितले होते. त्यानुसार ईडीने बर्मन कुटुंबियांबाबत खोटी तक्रार करणे व 'एम्प्लॉई स्टॉक ओव्हनरशिप प्लान'द्वारे निधी वळवून एकूण १७९ कोटी ५४ लाख रुपयांचा बेकायदेशीर फायदा घेतल्याप्रकरणी डॉ. रश्मी सलुजा, सीएफओ नितीन अग्रवाल व अध्यक्ष निशांत सिंगल व गवळी विरोधात मुंबई पोलिसांकडे तक्रार केली होती. त्याच्या आधारावर माटुंगा पोलीस ठाण्यात गेल्या आठवड्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता या नव्याने दाखल झालेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यांच्या आधारावर ईडीनेही गुन्हा दाखल केला आहे. त्याला ईडीच्या अधिकाऱ्याने दुजोरा दिला

## घाटकोपरमधील इमारतीला भीषण आग

**(पान १ वरुन)** तसेच, अग्निशामकांनाही धुरामुळे बचावकार्य करण्यात अडथळे येत होते. अग्निशमन दलातील जवानांनी इमारतीच्या विविध मजल्यावर अडकलेल्या जवळपास ८० ते ९० जणांना जिन्यावरून सुरक्षित बाहेर काढले. या दुर्घटनेत हर्षा भिसे (३५), स्विटी कदम (३५), जानवी राईगावकर (१७), प्रियांका काळे (३०), जसिम सय्यद (१७), ज्योती राईगावकर (३२), फिरोजा शेख (३५), लक्ष्मी कदम (५०), मानसी श्रीवास्तव (२४), अक्षरा दाते (१९), अबिद शाह (२२), अमीर खान (२७) आदी गुदमरले. त्यांना उपचारासाठी नजिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर आमिर खान यांना रुग्णालयातून घरी पाठविण्यात आले. उर्वरित १२ जमांवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

## मुंबई उच्च न्यायालयाकडून अटक वॉरंटची बतावणी

**(पान १ वरुन)** लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसंकडे तकार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे तपास करत आहेत. बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची बतावणी सायबर चोरट्यांनी कोथरुड भागातील एका महिलेची नऊ लाख २८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका महिलेने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस निरीक्षक चव्हाण तपास करत आहेत.

## समाज माध्यमांवर सायबर सेलची नजर

**(पान १ वरुन)** त्यामुळे जनतेने सावध राहावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जव्हार उपविभागातील पोलीस स्थानक हद्दीतील शहर व गावांना सर्वधर्मीयांच्या सामंजस्याचा चांगला इतिहास आहे. त्यामुळे कोणतीही चुकीची पोस्ट समाज माध्यमांवर आल्यावर त्याबाबत जवळच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी, असे आवाहन पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी केले आहे.

## वात्रटिका

### अजितदादा, तुमची चूकच झाली



अजितदादा, स्वत:चे कुटुंब फोडले
दुसऱ्याला उपदेश देऊ नका
चूक झाल्याचे नेहमीच कबूल करता
कार्यकर्त्यांना अडचणीत टाकूच नका

अन्नामांची मुलगी बापाच्याच विरोधात गेली
पवारांकडून पवारांकडेच आली
शेर कि बेटी शेरनी म्हणत
बापालाच धमकी देऊन गेली

घाण केली राजकारणाची
कुटुंब सोडल्याच्या चुका मान्य करू नका
महाराष्ट्र फोडला या घराण्यांनी
जनतेला वेठीस धरू नका

बहिणीच्या विरोधात बायको उभी केली
नंतर म्हणे चूक झाली
कुटुंब सोडून वेगळे निघालो
आता म्हणजे चूक झाली

आपल्या या चुकांनी
महाराष्ट्राची वाट लावली
वेळीस स्वत:ला सावरा
पश्चाताप करायची वेळ झाली

**- उमेश सुरेखा मारुती भेरे**
(संपादक, अग्रलेख)

Owner, Printer, Publisher and Editor UMESH MARUTI BHERE, AT POST DHASAI, TAL-SHAHAPUR, DIST-THANE, MAHARASHTRA. 421601, Printed at UDDESH VIKAS OFFSET PRINTING PRESS, LOKMANYA TILAK NAGAR, SECTION-20, KHETI AREA, ULHASNAGAR-421003. DIST-THANE, MAHARASHTRA. Published form UMESH MARUTI BHERE, AT POST DHASAI, TAL- SHAHAPUR, DIST-THANE, MAHARASHTRA. 421601, MOB. 8007101060, Editor : UMESH MARUTI BHERE, Editor do not necessarily agree with articles or news published in this newspaper, RNI NO - MAHMAR/2021/81361
Head Office Add.- Agralekh office, Sai Plaza, A wing, apartment no. A-3, 2nd floor, Gramin House No. 665, Gotheghar, Shahapur. 421601.

# डोंबिवलीत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक



**डोंबिवली (अग्रलेख वृत्तसेवा)** - लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवात सर्व जातीधर्माचे लोक सहभागी होत असतात. मंडळाचे अध्यक्ष कधी बदलतात तर काही मंडळे स्थापनेपासूनच जो अध्यक्ष निवडतात त्यालाच पुढे ही धुरा सांभाळायला देतात. आता हा अध्यक्ष इतर जातीधर्माचा असला तरी त्याला आपल्यालाच आहे असं समजून गुण्यागोविंदाने उत्सव साजरा करतात. डोंबिवलीतील शिव शंकर मित्र सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या स्थापनेपासून अध्यक्षपद मुस्लिम समाजातील एका माणसाकडे आहे. डोंबिवली पूर्वेकडील शेलार नाका येथील शिवशंकर नगर मित्र मंडळ गेली १८ वर्षे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करतात.

या मंडळाचा अध्यक्ष आहे राजू शेख आहेत. राजू शेख हे मंडळातील कार्यकर्त्यांसोबत गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापासून ते गणरायाचे भक्तिभावाने विसर्जन करेपर्यंत काम करतात. एवढेच नव्हे तर आरतीही करतात, शेख यांच्या बरोबर परिसरातील हिन्दू सोबतच इतर मुस्लिम समाजातील बांधवही गणरायाची भक्तिभावाने पूजा करतात. आरती करतात सामाजिक सलोखा व जगात सुख व शांती असावी असे श्री गणेशाकडे प्रार्थना असल्याचे शेख यांनी सांगितले. शिवशंकर नगर मित्र मंडळाच्या गणेशोत्सव मुस्लिम बंधन आरती करताना भाजपा कल्याण निवडणूक प्रमुख शशिकांत कांबळे, कल्याण जिल्हा सचिव मुकेश सेंघानी आदी उपस्थित होते.

# म्हसळा तालुक्यात गौरी-गणपतीचे वाजत गाजत उत्साहात विर्सजन; शहरात ३०० तर तालुक्यात १४६० गणेश मूर्तींचे विसर्जन



**म्हसळा (अग्रलेख वृत्तसेवा)** - म्हसळा तालुक्यात १४६० श्री गणपतींचे व १६२ गौरींचे वाजत गाजत, फटाकांच्या आतषबाजीत, गणपती बाप्पा मोरयाच्या गर्जनेत विर्सजन करण्यात आले.आज विर्सजन होणारे सर्वच गणपती खाजगी असल्याने जिल्हा धिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक रायगड यांचे नियम व निर्देशा प्रमाणे बहुतांश भाविकानी नियमांचे पालन करीत विसर्जन उत्साहात केले. तालुक्यात बहुतांश गावातून खाडी, नदी, तळी, मोठे ओहोळाचे पात्रात, ग्रामपंचायत /नगरपंचायतीने बांधलेले विसर्जन घाटावर श्रीचे व गौरींचे विसर्जन करण्यात आले. म्हसळा पोलीस स्टेशनचे सपोनी संदीप कहाले यांनी आपले सहकारी अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सहकार्याने विसर्जन सोहळ्याचे कार्यक्रमासाठी चोख बंदोबस्त ठेवला होता. याप्रसंगी मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, नगराध्यक्ष संजय कर्णिक, पोलीस निरीक्षक संदीप कहाले आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळा खुटारवाडी खोपिवली येथे शैक्षणिक साहित्य वाटप



**मुरबाड ग्रामीण (अग्रलेख वृत्तसेवा)** - मुरबाड तालुक्यातील शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावा यासाठी ग्रीन सोल फाऊंडेशन यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळा खुटारवाडी व खोपिवली येथील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

खोपिवली ग्रामपंचायत सदस्य मुकुंद कराळे, गोपाळ गोंडीवले व मोरेश्वर मोहपे यांनी ग्रीन सोल फाऊंडेशन यांच्याशी संपर्क साधून या फाऊंडेशनच्या माध्यमातून जवळपास २०० विद्यार्थ्यांना दप्तर, चप्पल व बसण्यासाठी चटई मोफत देण्यात आली. जिल्हा परिषद शाळा खुटारवाडी येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना व जिल्हा परिषद शाळा खोपिवली येथील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक साहित्य मोफत वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. मुकुंद कराळे यांच्या सहकार्याने खोपिवली ग्रामपंचायत हद्दीमधील विद्यार्थ्यांना नेहमीच शैक्षणिक साहित्य मिळविण्यासाठी प्रयत्न होत असतो. या कार्यक्रम प्रसंगी ग्रामपंचायत सरपंच चंद्रकांत वाघ, पत्रकार सुधाकर वाघ, खोपीवली ग्रामपंचायत सदस्य मुकुंद कराळे, किसन वाघ, पांडुरंग वाघ, वरिष्ठ शिक्षक शशिकांत डोहोळे, जि.प. शाळा खोपिवली मुख्याध्यापक सुधीर घिगे, तसेच शिक्षक, विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मत परिवर्तन

नक्षलवादींचे व्हावे
संपूर्ण मत परिवर्तन
अंतर्बाह्य स्वच्छता
बदलो हिंसक वर्तन

हिंसाचार मातलेला
पुन्हा पुन्हा आवर्तन
रक्तरंजीत अत्याचार
झाकोळले सद्वर्तन

सखोल करा विचार
का झाले अध:पतन
तरुण पिढी कु मार्गे
का करती अनुवर्तन

अ स्वस्थ समाजाचे
ते शोधावे मूलायतन
भुकेल्या वाघासमोर
उपयोगी नसे किर्तन

निर्ढावली गुन्हेगारी
सद्भाव होई अचेतन
सोपा मार्ग हिंसाचार
उद्रेकाचे बने आयतन

दुर्लक्षित वागणूकीत
सतत हो अव जतन
अवैधमार्ग अवलंबन
करे मानवता कर्तन

मुख्य प्रवाही आणाय
आधी करा प्रबोधन
माणूस मानून त्यांना
करे विश्वास संपादन

कठोर शिक्षा ताडण
अंतिम मार्ग रे शासन
शाश्वती खात्री व्हावी
इथे चालते सुशासन



**- हेमंत मुसरीफ** (पुणे)
मो. ९७३०३०६९९६.

# ६ महिन्यांनंतरही अवकाळीग्रस्तांना शासकीय मदतीची प्रतिक्षाच; झापवाडीचे शिद कुटुंब ऐन पावसाळ्यात झाले बेघर

**- संतोष दवणे -**



**किन्हवली (अग्रलेख वृत्तसेवा)** - शहापूर तालुक्यातील कानडी ग्रामपंचायत क्षेत्रातील झापवाडी या आदिवासी वाडीतील माजी सरपंच राहिलेल्या शिद कुटुंबाला ६ महिन्यांच्या प्रतिक्षेनंतरही अवकाळी पावसाच्या नुकसानभरपाईची शासकीय मदत मिळालेली नाही. सुमारे १ लाख ६५ हजार इतके मोठे नुकसान झालेल्या या आदिवासी कुटुंबावर ऐन पावसाळ्यात बेघर होण्याची वेळ आल्यानंतरही प्रशासनाने कुठलीही दखल न घेतल्याने आदिवासी समाजातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नोव्हेंबर २०२३, फेब्रुवारी, एप्रिल, मे २०२४ या कालावधीत अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याने शहापूर तालुक्यात अनेक कुटुंबांचे अतोनात नुकसान झाले होते. त्यानंतर संबंधित सजेच्या तलाठ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून वस्तुस्थितीदर्शक पंचनामे करून शासनाला सादर केले होते. कानडी ग्रामपंचायत क्षेत्रातील झापवाडी गावचे नागरिक दौलत धर्मा शिद यांचे संपूर्ण घर १५ एप्रिल रोजी झालेल्या वादळी पावसात उद्ध्वस्त झाले होते. त्यांच्या घरावरील पत्रे, धापे, लोखंडी पाईप, भिंती, घरातील सामान, अन्नधान्य असे मिळून १ लाख ६५ हजार ३८० रुपयांचे नुकसान झाले होते. दीड महिन्यांच्या पाठपुराव्यानंतर काही नुकसानग्रस्तांना ४ ते ७ हजार रुपयांपर्यंत नुकसानभरपाई देण्यात आली होती. मात्र एप्रिल २०२४ मधील ५५३ नुकसानग्रस्तांच्या नुकसान भरपाईसाठी ३७ लाख रुपयांची मागणी करण्यात आली असताना त्यापैकी १९ लाख १४ हजार ५०० इतकीच रक्कम शासनाकडून शहापूर महसूल विभागाला प्राप्त झाल्यामुळे ५५३ पैकी २४४ नुकसानग्रस्तांनाच प्राधान्यक्रमाने ऑनलाइन पद्धतीने नुकसानभरपाई वाटप करण्यात आली होती. त्यानंतर मे २०२४ मधील नुकसानग्रस्तांसह मागील यादीतील वंचित नुकसानग्रस्तांसाठी ६९ लाखांची मागणी शासनाकडे करण्यात आली. परंतु दुर्दैवाने सप्टेंबर उजाडला तरी महाराष्ट्र शासनाने उर्वरित नुकसानग्रस्त नागरिकांना नुकसानभरपाई निधी मंजूर केलेला नाही. दरम्यान कानडी ग्रामपंचायतीचे सरपंच राहिलेल्या दौलत धर्मा शिद व प्रमिला दौलत शिद या कुटुंबाला कोणतीही मदत शासनाकडून न मिळाल्याने श्रमजीवी संघटना शहापुरच्या पदाधिकाऱ्यांनी शासकीय दिरंगाईबाबत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

> "आम्ही दोघे पती-पत्नी सरपंचपद भूषविलेले असून आमच्या घराच्या पडझडीनंतर कुठलीही तातडीची शासकीय मदत आम्हाला मिळालेली नाही. जिजाऊने काही सिमेंट पत्रे देवून आम्हाला दिलासा दिला असला तरी घराचे नुकसान पाहता मोठ्या मदतीची शासनाकडून अपेक्षा होती. परंतु गेल्या ६ महिन्यांत सरकारने आमच्या तोंडाला पानेच पुसली आहेत.
>
> **- दौलत धर्मा शिद** (अवकाळीग्रस्त आदिवासी, झापवाडी)

# पालघर पोलीस दल व युथ फॉर पिपल यांच्याकडून गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप



**मोखाडा (अग्रलेख वृत्तसेवा) -** पालघर जिल्हा पोलीस दल व यूथ फॉर पिपल संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पालघर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून मोखाडा तहसील कार्यालयात जनसंवाद अभियान अंतर्गत तालुक्याच्या विविध भागातील जवळपास ५२ गरजु व गुणवंत विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. अधीक्षक बाळासाहेब पाटील व यूथ फॉर पिपिल संस्थेचे नारायण वेंकटेश यांच्या हस्ते सायकल वाटप उपक्रम यशस्वी झाला.

या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना बाळासाहेब पाटील यांनी सांगितले की, यूथ फॉर पिपल ही संस्था गेल्या दहा वर्षांपासून गराजूंना मदतीसाठी कार्यरत आहे, जनसंवाद अभियान अंतर्गत शालेय मुलींना सायकल वाटप आम्ही करत आहोत. ह्या सायकलचे महत्व येत्या काही दिवसात दिसणार आहे, कारण ज्यांना गरज नाही त्यांच्यापर्यंत सगळ्या सुविधा उपलब्ध होतात. मात्र ज्यांना खरच गरज आहे त्यांना मात्र काहीही सुविधा मिळत नाही, मुलींना शाळेत ये-जा करण्यासाठी सायकलचा उपयोग होणार आहे. खरतर पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. त्यामध्ये येथील नागरिकांना अनेक समस्या उद्भवतात या समस्यांच्या खोलवर जाऊन समस्या मूळासकट नाहीसे करणे हे तुमचे आमचे काम आहे. यासाठी प्रत्येक गावात पोलीस पाटील हे कौतुकास्पद काम करत आहेत.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी सांगितले की शालेय मुलींना मोफत सायकल वाटप केली यात मुलींना शाळेत ये-जा साठी सोईस्कर ठरणार आहे. मुलगी शाळेत गेलीच पाहिजे कारण आपल्या जिल्ह्यात बऱ्याच भागात बालविवाहमुळे अनेक मुलींनी आपला जीव गमावले आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे. पोलीस यंत्रणा कार्यवाही करणारच परंतु आपली मुलगी अठरा वर्षाची झाल्यानंतर ती जेव्हा स्वत:च्या पायावर उभी राहिल त्यावेळी त्यांच्या कुटुंबाने त्या मुलीच्या लग्नाचा विचार करावा यामुळे आपण बालविवाह रोखु शकतो.

विक्रमगड विधानसभेचे आमदार सुनील भुसारा यांनी बोलताना सांगितले की, सामाजिक कार्य प्रत्येक पुढारी आपआपल्या क्षेत्रात करत असतो, पुढारी फक्त राजकीय क्षेत्रात नसून प्रत्येक क्षेत्रात असतो सरळ मार्गाने लोकांना एकत्र घेवून त्यांच्या समस्याचे निवारण करतो तो खरा पुढारी. खरंतर पालघर पोलीस दल पोलीस कार्य बजावत आहेत. त्याचप्रमाणे एक सामाजिक कार्य सुद्धा जनसंवाद अभियान अंतर्गत करत आहेत. शालेय मुलींना जी काही सायकल मोफत वाटप केली त्याबद्दल आपले अभिनंदन व कौतुक करत आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, यूथ फॉर पिपल संस्थेचे नारायण वेंकटेश, जि.प पालघर अध्यक्ष प्रकाश निकम, आमदार सुनील भुसारा, अ.पो. अधीक्षक विनायक नरळे, दिपक, तहसीलदार मयूर खेंगले, उप विभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंगळे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी धनंजय तायडे, सहा.पो.निरीक्षक प्रदीप गीते, सहा.पोलीस निरीक्षक प्रेमनाथ ढोले, पंचायत समिती उपसभापती प्रदिप वाघ, संतोष चोथे, जमशिद शेख, प्रल्हाद कदम, डॉ.मिठाराम कडव आदी उपस्थित होते.

# म्हाडा घरांच्या किमतीत वाढ; अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ऐनवेळी किंमतीत बदल करण्याची वेळ

**मुंबई (अग्रलेख वृत्तसेवा) -** म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ च्या सोडतीतील पुनर्विकासाअंतर्गत उपलब्ध झालेल्या ३७० घरांच्या किमतीत १० ते २५ टक्क्यांची कपात करून म्हाडाने अर्जदारांना दिलासा दिला. मात्र, त्याचवेळी ३७० पैकी अल्पगटातील १४ घरांच्या किमती २० टक्क्यांनी कमी होण्याऐवजी १२ ते १३ लाख रुपयांनी वाढल्या. मुंबई मंडळातील अधिकाऱ्यांनी घरांच्या किमती निश्चित करताना घातलेल्या घोळाचा फटका इच्छुक, अर्जदारांना बसणार आहे. या १४ घरांसाठी चुकीच्या शीध्रगणकानुसार (रेडी रेकनर) किमती निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे अर्ज विक्री-स्वीकृती प्रक्रियेस काही दिवस शिल्लक असताना किमतीत बदल करण्याची नामुष्की मंडळावर आली. या घरांच्या सुधारित किमती मंडळाने जाहीर केल्या आहेत. मुंबई मंडळाला म्हाडा वसाहतीच्या ३३ (५) अंतर्गत पुनर्विकासाद्वारे आणि उपकरप्राप्त इमारतींच्या ३३ (७) अंतर्गत पुनर्विकासाद्वारे २०२४ च्या सोडतीसाठी ३७० घरे उपलब्ध आहेत. उपलब्ध घरांच्या किमती या नियमानुसार त्या त्या परिसरातील शीध्रगणक दराच्या ११० टक्के दराने निश्चित करण्यात येतात. मात्र, या घरांचे क्षेत्रफळ, उत्पन्न गट आणि घरांच्या किमती यात तफावत असल्याने घरे महाग झाली आहेत. त्यामुळे यावरून म्हाडावर मोठी टीका होत होती. अल्प गटातील घर पावणेतीन कोटी रुपयांच्या घरात गेले होते. यावरून झालेली टीका लक्षात घेऊन म्हाडा प्राधिकरणाने घरांच्या किंमती उत्पन्न गटानुसार १० ते २५ टक्क्यांची कपात केली. त्यानुसार ३७० घरांच्या किंमतीत घट झाली असून नवीन किंमती म्हाडाच्या सोडतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. असे असताना या ३७० घरांपैकी कुर्ल्यातील संकेत क्रमांक ४९५ मधील अल्प गटातील स्वानंद प्रकल्पातील १४ घरांच्या किमती नियमानुसार २० टक्क्यांनी कमी होणे अपेक्षित होते. 'स्वानंद' प्रकल्पातील १४ घरांसाठी ४३ लाख ९७ हजार ९५९ रुपये आणि ४५ लाख ४० हजार २०० रुपये अशा किमती निश्चित करण्यात आल्या होत्या. म्हाडा प्राधिकरणाच्या २८ ऑगस्टच्या निर्णयानुसार या घरांच्या किमतीत २० टक्क्यांनी कपात होईल, अशी आशा या घरांसाठी अर्ज भरलेल्यांना तसेच अर्ज भरू इच्छिणाऱ्यांना होती. किमतीत कपात होण्याऐवजी २ सप्टेंबरला या किमतीत १२ ते १३ लाख रुपयांनी वाढ करण्यात आली. त्यामुळे ४३ लाख ९७ हजार ९५९ रुपये असलेली घराची किंमत ५६ लाख ७९ हजार ३१३ रुपये झाली आहे. तर ४५ लाख ४० हजार २०० रुपयाला असलेल्या काही घरांची किंमत आता ५८ लाख ६३ हजार २६३ रुपये झाली आहे. मुंबई मंडळाच्या शुद्धीपत्रानुसार या घरांच्या किंमती २०२४-२५ च्या शीध्रगणकानुसार निश्चित करण्यात आल्या. मात्र चुकीचे शीध्रगणकाचे दर आकारण्यात आले. १ लाख २५ हजार १७० रुपये प्रति चौरस मीटर याप्रमाणे दर निश्चित करणे आवश्यक असताना संबंधित अधिकाऱ्याने ८५ हजार २९४ प्रति चौरस मीटर दराने त्या निश्चित करण्यात आल्या.

# के. व्ही. हायस्कूलची निकिता निलेश मोर जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत उपविजयी

**जव्हार (अग्रलेख वृत्तसेवा) -** युवक व क्रीडा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, पालघर आयोजित बुद्धीबळ स्पर्धेत के. व्ही. हायस्कूलची विद्यार्थिनी निकिता निलेश मोर ही उपविजेतेपदाची मानकरी ठरली.


बोईसर येथे पार पडलेल्या पालघर जिल्हास्तरीय शालेय बुद्धीबळ स्पर्धेत जव्हार तालुकास्तरीय स्पर्धेत विजयी स्पर्धक सहभागी झाले होते. १७ वर्षांखालील मुलींच्या स्पर्धेत के. व्ही. हायस्कूल व आर. वाय. ज्युनिअर जव्हार येथील विद्यार्थीनी निकिता निलेश मोर हिने अंतिम सामन्यापर्यंत धडक देत उपविजेतेपद पटकावून विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे .




निकिता मोर, पालक व क्रीडा शिक्षक किरण पवार यांचे शाळेचे मुख्याध्यापक अवधूत गावड, शिक्षक, विद्यार्थी व जव्हारवासीयांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



साईनाथ मित्र मंडळाचा डोंबिवलीचा मानाचा 'जाधववाडीचा महाराजा' दर्शन घेण्याकरता भविकांची गर्दी. अध्यक्ष दिनेश जाधव यासह कार्यकर्ते अथक मेहनत घेत आहेत.



कडोंमपा माजी नगरसेविका हर्षदा भोईर व माजी नगरसेवक हृदयनाथ भोईर यांच्या डोंबिवली पश्चिमकडील गोकर्ण बंगल्यात श्री स्वामी समर्थच्या प्रतिकृतीत विराजमान झालेल्या श्री गणेशाची मूर्ती.

गणेशोत्सव निमित्त खास ऑफर

श्री इलेक्ट्रीकल्स

POLYCAB LED

| LED | MRP | SPECIAL OFFER |
|---|---|---|
| 5 wt. | ~~125~~ | 51 |
| 7 wt. | ~~130~~ | 53 |
| 9 wt. | ~~130~~ | 55 |
| 12 wt. | ~~195~~ | 110 |
| 15 wt. | ~~260~~ | 155 |
| 18 wt. | ~~280~~ | 195 |
| 23 wt. | ~~440~~ | 295 |
| Charging Bulb | ~~480~~ | 295 |
| 20 wt. Led Tubelight | ~~280~~ | 110 |
| Decorative Lighting | ~~250~~ | 99 |

ऑफर फक्त मर्यादीत स्टॉकपर्यंत ०१ वर्षाची वॉरंटी

श्री. अमोल अंदाडे (मो. नं. ८८०५४६९१८८)

पत्ता : श्री कृपा बिल्डींग, शहापूर-किन्हवली रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक (सापगांव नाका), सापगांव, ता. शहापूर, जि. ठाणे